**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी/ शासकीय संस्थांना नवीन तंत्रनिकेतन सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. मान्यता-२००९/(३०४/०९)/तांशि-५,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ३० जून, २००९ .

संदर्भ :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचे
क्र. एफ २२/२८३९ /२००९/(DIP-ENGG), दिनांक २९ जून, २००९ चे पत्र

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या एकूण ८५ खाजगी संस्थांना व एका शासकीय संस्थेस नविन तंत्रनिकेतन सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयाद्वारे सोबतच्या विवरणपत्र अ येथील स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या संस्थांना स्तंभ ३ व ४ मध्ये नमूद केलेले अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेसह खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून नविन तंत्रनिकेतन सुरु करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२) सदर अभ्यासक्रमांसाठी संस्थेची प्रवेशक्षमता सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये दर्शविलेल्या स्तंभ ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टीईएम ३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१(अ),दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना अनुदान तंत्र शिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.
४) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते, इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.
५) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.
६) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.
७) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.
८) सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहील व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.
९) सदर पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

१०) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग अॅक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१२) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३) शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंतर्भूत करण्याचे अधिकार शासनाचे राहतील.

३. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 200507161704300001 आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( व्यं. ह. कुलकर्णी )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/औरंगाबाद.
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई.
संबंधित संस्था

**<u>प्रत माहितीसाठी</u>**

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई २०.
निवड नस्ती / तांशि-५

C:\Documents and Settings\m\My Documents\Lole\TE5\Permission\Letter.doc

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.मान्यता २००९/प्र.क्र.३०४/०९/तांशि ५, दि.३० जून,२००९, सोबतचे विवरणपत्र.

पुणे विभाग

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | मंजूर अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या पत्र क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान, अक्कलकोट – ४१३ २१६, जि. सोलापूर/ एस.व्ही.एस.एम.डी.पॉलि., गेट नं. ६०४/२, अक्कलकोट ४१३ २१६ | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | पत्र क्र.एफ २२-२८९३/२००९ (डीप्लो.इंजि), दि.२९-६-२००९ |
| | | कॉम्प्यूटर इंजिनिअरींग | ६० | |
| | | इलेक्ट्रॉ.अँड टेलि.इंजि. | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | |
| २ | श्री.वेंकटेश्वर शिक्षण संस्था,ता. वाळवा, जि. सांगली ४१५ ४०७ / नानासाहेब महाडीक पॉलि. इन्स्टि., गेट नं.९०५ ए/१, पुणे बी अँगलोर एनएच-४ हायवे, पोस्ट पेठ, ता. वालवा, जिल्हा सांगली ४१५ ४०७ | कॉम्प्यूटर इंजिनिअरींग | ६० | पत्र क्र.एफ २२-२८९४/२००९ (डीप्लो.इंजि), दि.२९-६-२००९ |
| | | इलेक्ट्रॉ.अँड टेलि.इंजि. | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | |
| | | इलेक्ट्रिकल इंजि. | ६० | |
| | | इन्फरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | |
| ३ | विद्यावर्धिनी एज्युकेशन अॅकॅडमी, जि. कोल्हापूर / विद्यावर्धिनी एज्यु.अॅकेडॅमी विद्यावर्धीनी इन्स्टि.ऑफ टेक्नॉ.,गेट नं.४३७/१, पाल, ता.भुदरगड | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | पत्र क्र.एफ २२-२८९५/२००९ (डीप्लो.इंजि), दि.२९-६-२००९ |
| | | इलेक्ट्रॉ.अँड टेलि.इंजि. | ६० | |
| | | कॉम्प्यूटर इंजिनिअरींग | ६० | |
| | | इलेक्ट्रिकल इंजि. | ६० | |
| | | सिव्हील इंजिनिअरींग (दुरुस्तीप्रमाणे) | ६० | |
| ४ | रामकृष्ण टेक्निकल एज्यु. सोसायटी, ता.संगोला, जि.सोलापूर ४१३ ३०७ शिवाजी पॉलि.कॉलेज, सर्व्हे नं.७६/१, ७७ सांगोला, जॅट रोड, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर ४१३ ३०७ | कॉम्प्यूटर इंजिनिअरींग | ६० | पत्र क्र.एफ २२-२८९६/२००९ (डीप्लो.इंजि), दि.२९-६-२००९ |
| | | इलेक्ट्रिकल इंजि. | ६० | |
| | | इलेक्ट्रॉ.अँड टेलि.इंजि. | ६० | |
| | | इन्फरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | |
| ५ | श्रीराम एज्युकेशन सोसायटी, ता.आटपाडी,जि.सांगली ४१५ ३०१ श्रीराम एज्यु.सोसायटी शिवाजी पॉलि., १३७०, गेट निं.४१६९ ते ४१७५, ता.आटपाडी,जिल्हा सांगली ४१५३०१ | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | पत्र क्र.एफ २२-२८९७/२००९ (डीप्लो.इंजि), दि.२९-६-२००९ |
| | | कॉम्प्यूटर टेक्नॉलॉजी | ६० | |
| | | इलेक्ट्रॉ.अँड टेलि.इंजि. | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | |
| | | इलेक्ट्रिकल इंजि. | ६० | |

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.मान्यता २००९/प्र.क्र.३०४/०९/तांशि ५, दि.३० जून,२००९, सोबतचे विवरणपत्र.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १४ | दि पिपल एज्यु. सोसायटी, जि.अहमदनगर / दि पिपल एज्यु.सोसा. डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजि.अँड टेक्नॉ., जामखेड, जि.अहमदनगर | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | पत्र क्र.एफ २२-२९८९/२००९ (डीप्लो.इंजि), दि.२९-६-२००९ |
| | | कॉम्प्यूटर इंजिनिअरींग | ६० | |
| | | इलेक्ट्रिकल इंजि. | ६० | |
| १५ | किसान ज्ञानोदय मंडळ गुढे, जि.जळगांव / किसन ज्ञानोदय मंडळ गुढे डॉ.उत्तमराव महाजन इन्स्टि.ऑफ इंजि.अँड टेक्नॉ. (डिप्लोमा), गेट नं.१४० २ ए/१, १४० २ए/२, औरंगाबाद बायपास रोड, चाळीसगांव जि.जळगांव | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | पत्र क्र.एफ २२-२८८१/२००९ (डीप्लो.इंजि), दि.२९-६-२००९ |
| | | कॉम्प्यूटर इंजिनिअरींग | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | |
| १६ | जिजामाता फाऊंडेशन जळगाव, जळगांव / सौ.निर्मलाताई पी.पाटील पॉलि. (महिलांचे) कॉलेज, जळगांव | इन्फरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | पत्र क्र.एफ २२-२८८७/२००९ (डीप्लो.इंजि), दि.२९-६-२००९ |
| | | कॉम्प्यूटर इंजिनिअरींग | ६० | |
| | | इले.अँड टेलि.इंजि. | ६० | |